# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.२०५/२११७/२०२५ दि. १७/०७/२०२५.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) क्र.४७/२०१८ दि.११/०१/२०१८.
२) सुधारित बांधकाम परवानगी क्र.९५२/२०२०, दि. २७/०८/२०२०.
३) सुधारित बांधकाम परवानगी क्र.७०४/२०२५ दि.११/०३/२०२५.
४) विकसक मे. केदार असोसिएट्स यांचे दि.२७/०६/२०२५ रोजीचे पत्र.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **मौजे पर्वती, पुणे येथील फायनल.प्लॉ.क्र.५८६,(स.नं. १३५),** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील उपरोक्त वाचा ३ मध्ये नमूद केलेनुसार क्र.झोपुप्रा/७०४/२०२५, दि.११/०३/२०२५ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिकांसाठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत विकसक मे. केदार असोसिएट्स यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीनुसार अंतिम भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

**पुनर्वसन इमारत - १९४ पुनर्वसन सदनिका + १४ दुकाने + २ बालवाडी + २ वेलफेअर सेंटर + सोसायटी ऑफिस + पार्किंग**

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|
| ०१ | Lower Ground Floor | पार्किंग | पार्किंग |
| ०२ | Ground Floor | १४ दुकाने + २ बालवाडी + २ वेलफेअर सेंटर + सोसायटी ऑफिस+ पार्किंग | १४ दुकाने + २ बालवाडी + २ वेलफेअर सेंटर + सोसायटी ऑफिस+ पार्किंग |
| ०३ | पहिला मजला | सदनिका क्र.१०१ ते ११८ | १८ सदनिका |
| ०४ | दुसरा मजला | सदनिका क्र.२०१ ते २१८ | १८ सदनिका |
| ०५ | तिसरा मजला | सदनिका क्र.३०१ ते ३१८ | १८ सदनिका |
| ०६ | चौथा मजला | सदनिका क्र.४०१ ते ४१८ | १८ सदनिका |
| ०७ | पाचवा मजला | सदनिका क्र.५०१ ते ५१८ | १८ सदनिका |
| ०८ | सहावा मजला | सदनिका क्र.६०१ ते ६१८ | १८ सदनिका |
| ०९ | सातवा मजला | सदनिका क्र.७०१ ते ७१८ | १८ सदनिका |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | आठवा मजला | सदनिका क्र.८०१ ते ८१४ | १४ सदनिका + Refugee |
| ११ | नऊवा मजला | सदनिका क्र.९०१ ते ९१८ | १८ सदनिका |
| १२ | दहावा मजला | सदनिका क्र.१००१ ते १०१८ | १८ सदनिका |
| १३ | अकरावा मजला | सदनिका क्र.११०१ ते १११८ | १८ सदनिका |
| पुनर्वसन **इमारत - १९४** पुनर्वसन **सदनिका + १४ दुकाने + २ बालवाडी + २** वेलफेअर सेंटर **+ सोसायटी ऑफिस+ पार्किंग** | | | |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**अटी:-**

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंतिम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) दि.२५/०६/२०२५ रोजीच्या अग्निशमन विभागाकडील अंतिम ना- हरकत प्रमाणपत्रामधील सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

६) विकसक यांचे दि.११/०७/२०२५ रोजीच्या पत्रानुसार HCMTR अंतर्गत क्षेत्र पुणे महानगरपालिकेस हस्तांतरित केलेबाबतची कागदपत्रे अंतिम टप्प्यातील १०% टी.डी.आर. अदा करणेपूर्वी कार्यालयात सादर करणे विकसकावर बंधनकारक राहील

७) इमारतीच्या उत्तर व पुर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal / open space) कोणत्याही अडथळ्याशिवाय पुर्णपणे खुले आहे.

८) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

९) सदर योजनेसाठी उद्यान विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र योजनेसाठीचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र घेणेपुर्वी आवश्यक राहील.

१०) दि.१७/०७/२०२५ रोजीच्या पत्रानुसार योजना क्षेत्रातील समोरील बाजूच्या सामासिक अंतरातील गणपती मंदिराची जागा १०% TDR मागणी पूर्वी मोकळी करणे विकसकावर बंधनकारक राहील

११) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

१२) लिफ्टस, STP, Fire hydrant, Generator backup system व Water pumping इ.बाबत विकसकाने त्यांच्या खर्चाने ५ वर्षाकरिता वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक राहील.

१३) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या
दि. ११/०७/२०२५ रोजीच्या मान्यतेनुसार

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. विकसक:- मे. केदार असोसिएट्स, ८१०,ए बिल्वकुंज अपार्टमेंट, फ्लॅट क्र.०५,भांडारकर रस्ता, पुणे -४११००४
२. वास्तुविशारद:-ओंकार असोसिएट्स, २ तृप्ती अपार्टमेंट, रंजित हॉटेलसमोर, भांडारकर रोड, पुणे.
३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.
४. संगणक अधिकारी यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.